महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : आरटीटी-०३२१/प्र.क्र.६७/२०२१/जाहिरात दिनांक :- २७ जून, २०२४

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

**महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-ब सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सन २०२४ च्या स्पर्धा परीक्षेच्या अंदाजित वेळापत्रकानुसार महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट- क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ करीता जाहिरात माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये प्रसिद्ध करण्याचे व प्रस्तुत पूर्व परीक्षा दिनांक १६ जून, २०२४ रोजी घेण्याचे नियोजित होते. दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षण अधिनियम, २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ अधिनियमाद्वारे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता राज्याच्या नियंत्रणाखालील पदांवरील नियुक्तीकरीता आरक्षणाची तरतूद करण्यात आली असून शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी २०२४/प्र.क्र.७५/१६-क, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ मधील तरतुदीनुसार प्रस्तुत परीक्षेकरीता अद्याप निवड प्रक्रिया सुरु न झाल्याने अधिनियमातील तरतुदी सदर जाहिरातीकरीता लागू आहेत.

२. उपरोक्त पार्श्वभूमिवर महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब गट- क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ जाहिरातीकरीता शासनाच्या विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या मागणीपत्रांमध्ये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता पदे उपलब्ध होत असल्यास त्याप्रमाणे पदसंख्या व आरक्षण नमूद करुन तात्काळ विहित नमुन्यातील सुधारित मागणीपत्र नव्याने आयोगास पाठविण्याची व्यवस्था करण्याबाबत शासनाच्या संबंधित विभागास कळविण्यात आले आहे. त्यास अनुसरून काही विभागांकडून सुधारित मागणीपत्रे प्राप्त झाली आहेत. अप्राप्त मागणीपत्रांबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर सुधारित मागणीपत्रे प्राप्त झाल्यावर महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट- क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४करीता जाहिरात प्रसिद्ध करण्यात येईल.

उपसचिव,(जाहिरात)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग